## निशाणी क्र. ३३ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी वादीचा पुढील सरतपास घेण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचे प्रकरण वादीचे उलटतपासाकरीता नेमण्यात आले आहे. परंतु प्रस्तुत कामी पुढील सरतपास होण्यापुर्वीच विना उलटतपासाचा आदेश पारित झाला आहे. सध्या प्रतिवादीने सदर विना उलटतपासाचा आदेश रद्द करुन घेतला आहे. परंतु वादीचा पुढील सरतपास पुर्ण झाल्याशिवाय वादीचा उलटतपास घेणे न्यायोचीत होणार नाही. त्यामुळे वादीचे पुढील कागदपपत्रांसंबंधीचा सरतपास घेणे जरुरीचे व महत्त्वाचे झाले आहे. सबब न्यायाचे दृष्टीने वादीचा पुढील सरतपास घेण्यासाठी परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने दिलेला अर्ज या स्थितीत पात्र नाही व तो मुळीच मान्य व कबूल नाही. तसेच सदर दावा आज रोजी वादीचा उलटतपास घेण्यासाठी आहे, त्यामुळे वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे या स्थितीला वादीचा सरतपास घेता येणार नाही . दावा प्रतिवादीने उलटतपास घेण्यासाठी असल्याने वादीला कोणतीच दाद मागता येणार नाही. वादीने स्वतः नि.क्र. १८ वरती विना उलटतपास आदेश पारित करणेसंबंधी वारंवार विनंती केली त्यामुळे दि. ०७/१०/२०२१ रोजी न्यायालयाने तसा आदेश केला आहे. तसेच वादीचे विनंतीप्रमाणे प्रतिवादी उलटतपास घेत नाही म्हणुन कॉस्ट केलेली आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, वादीचा सरतपास पुर्ण झालेला आहे व प्रतिवादीने उलटतपास घेण्याचा आहे. वादीस सरतपास घेण्यासंबंधी या स्टेजला कोणतीच कायदयाची तरतुद नसल्याने सदरचा वादीचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

४. या प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता, वादीने नि.क्र. १८ वर पुराव्याचे ॲफिडेव्हीट दि. ०८/०३/२०२१ रोजी दाखल केले आहे. त्यानंतर प्रतिवादीने वादीचा उलटतपास घेतले नसल्याने दि. ०७/१०/२०२१ रोजी प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादीने नि.क्र. २१ वर दि. २०/१२/२०२१ रोजी अर्ज दाखल करुन सदरचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द करुन घेतला आहे. त्यानंतर सदर दावा हा वादीच्या उलटतपासाकरीता प्रलंबित आहे. त्यावेळी वादीने प्रस्तुतचा वादीचा पुढील सरतपास घेण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

५. सदर परवानगीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे हक्कावर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत वादीला न्यायाचे कारणास्तव संधी दिली नाही तर न्यायालयीन कामकाजाचे बाहुल्य वाढणार आहे. तसेच प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्यास पुर्ण संधी उपलब्ध आहे. अदयाप उलटतपास प्रलंबित आहे. तसेच अर्ज मंजुर केल्यास उभयपक्षातील वादाचे

कायमस्वरुपी निराकरण करणे सोईचे होईल त्याचप्रमाणे दावा गुणावगुणांवर निकाली काढण्यास मदत होईल. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल . याउलट प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याची पुरेपूर संधी मिळणार आहे व दावा गुणावगुणावंर निकाली निघण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. त्याकरिता खालील आदेश देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. ३३ वरील अर्ज ५००/– रुपये वादीने प्रतिवादी यांना देण्याच्या खर्चासह मंजुर करण्यात येतो. |

sd/-

**(पी. पी. बागुल)**

दि. १०/११/२०२३.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A. B. Sandrok |
| Court | - | 2nd Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 10.11.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 10.11.2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 10.11.2023 |